**<u>नियमित दिवाणी दावा क्र.६११/२०२३ मधील निशाणी क्रमांक २६ वरील आदेश</u>**

**<u>( नेताजी पाटील विरुध्द जिल्हाधिकारी, सांगली+९)</u>**

**<u>(CNR No.MHSN050032752023)</u>**

१. प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र.७ यांनी त्यांच्या विरुध्द झालेला 'विना कैफियत' आदेश रद्द करुन त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्यात यावी याकरीता दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुत प्रतिवादी यांच्या म्हणण्यानुसार, त्यांना महत्वाची कागदपत्रे वेळेत मिळून आली नाहीत, तसेच मुळ कर्जदार यांच्या मालकीबाबतचे कागदपत्र व वादीच्या दाव्यासंबंधी महत्वाचे कागदपत्राचा शोध वेळेत घेता आला नाही. त्याचप्रमाणे प्रस्तुत प्रतिवादी बँकेचे आर्थिक वर्ष संपत आल्याने कामाचा ताण असल्यामुळे त्यांना मुदतीत कैफियत देता आली नाही. करीता त्यांच्याविरुध्द विना कैफियत आदेश झालेला आहे. प्रस्तुत प्रतिवादीविरुध्द झालेला 'विना कैफियत' आदेश रद्द होवून त्यांची कैफियत दाखल करुन घ्यावी अशी त्यांनी विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जास निशाणी २७ वर म्हणणे दाखल करुन वादी यांनी ठाम विरोध दर्शविला. वादी यांच्या म्हणण्यानुसार प्रस्तुत प्रतिवादी यांना पुरेशी मुदत देवून देखील कैफियत न दिल्याकारणाने दिनांक १९.०१.२०२४ रोजी त्यांच्याविरुध्द विना कैफियत आदेश झालेला आहे. सदरचा विलंब हा केवळ वादीस त्रास देण्याच्या हेतुने केलेला असून सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा. यदाकदाचित अर्ज मंजूर करण्याच्या निर्णयाप्रत मे. कोर्ट आल्यास प्रस्तुत प्रतिवादी यांना रक्कम रुपये ३०००/- कॉस्ट करण्यात यावी अशी विनंती केली आहे.

४. अर्ज व म्हणणे वाचला. अभिलेखावर दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले.

५. प्रस्तुत दावा वादी यांनी निरंतर मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.७ यांच्या म्हणण्यानुसार त्यांना मुळ कर्जदार यांच्या मालकीबाबतचे कागदपत्र व वादीच्या दाव्यासंबंधी महत्वाची कागदपत्र वेळेत मिळाली

नाहीत. तसेच प्रस्तुत प्रतिवादी बँकेचे आर्थिक वर्ष संपत आल्याने व कामाचा ताण असल्यामुळे त्यांना मुदतीत कैफियत देता आली नाही.  प्रस्तुत प्रतिवादी यांनी त्यांची कैफियत दाखल करण्यास झालेल्या विलंबाबाबत देण्यात आलेल्या स्पष्टीकरणावरुन असे दिसून येते की, सदरचा विलंब हा त्यांनी जाणीवपूर्वक केलेला नाही. दाव्याचा निकाल गुणदोषावर होण्याकरीता दाव्यातील सर्व प्रतिवादी यांना त्यांची कैफियत दाखल करण्याची संधी मिळणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत प्रस्तुत प्रतिवादी यांच्याविरुध्द झालेला 'विना कैफियत' आदेश रद्द करुन त्यांना कैफियत दाखल करण्याची परवानगी दिल्यास वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेतल्यास दाव्याचा व ताकीद अर्जाचा निकाल गुणदोषावर होण्याकरीता मदतच होईल. वरील सर्व बाबींचा सारासार विचार करता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रतिवादी क्र.७ यांचेविरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द करण्यात येतो.

२. प्रस्तुत प्रतिवादी यांनी दाखल केलेली कैफियत व म्हणणे अभिलेखावर दाखल करुन घेण्यात येते.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by MUKUL MADHUSUDAN CHITALE
Date: 2024.08.08 12:19:09 +0530

**इस्लामपूर.** **(मुकुल म. चितळे)**

**दिनांक –०६.०८.२०२४** **दुसरे सह–दिवाणी न्यायाधीश व. स्तर, इस्लामपूर.**

**प्र मा ण प त्र**

मी खात्रीपुर्वक सांगतो की, सदरहु पी. डी. एफ. फाईलमधील सर्व मजकूर मुळ आदेशाप्रमाणे शब्द नि शब्द बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | - | सतिश कृष्णा पाटील, |
| कोर्टाचे नाव | - | दुसरे सह दिवाणी न्यायालय व. स्तर, इस्लामपूर. |
| आदेश घोषीत दिनांक | - | **०६.०८.२०२४** |
| पी.डी.एफ/अपलोडचा दिनांक- | | **०८.०८.२०२४** |